मेट्रो सिटी आयकॉन 2024 पुरस्कार 2 जानेवारी रोजी

e Paper

मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड 2024

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 29/१२/२०२४ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 10 | RNI - MAHMAR/2021/51259 | metrocity924@gmail.com

# मेट्रो सिटी आयकॉन 2024 पुरस्कार जाहीर




**2 जानेवारी 2024, दुपारी 3 वाजता, स्थळ : ऑटो क्लस्टर सभागृह,चिंचवड,पुणे**

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे व पिंपरी चिंचवड शहरात पत्रकारिता क्षेत्रात अग्रेसर असलेली शबनम न्यूज मीडिया ग्रुप या वृत्तसंस्थेच्या माध्यमातून दरवर्षी मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येतो. पुणे व पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कायदे, क्रीडा, आरोग्य, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो, यावर्षी संस्थेच्या वतीने मेट्रोसिटी आयकॉन पुरस्काराचे मानकरी जाहीर करण्यात आले आहे.दोन जानेवारी रोजी संपन्न होत असलेल्या या पुरस्कार सोहळ्यात शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात येत आहे. तसेच या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याचबरोबर सदर पुरस्कार सोहळ्यात चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप, पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष तथा माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, शिवसेना उपनेते तथा कामगार नेते इरफान भाई सय्यद, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले, सरिता साने सखी मंचच्या अध्यक्षा सरिता अरुण साने यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या पुरस्कार सोहळ्याचे मानकरी अधिरा इंटरनॅशनल स्कूल पुनावळे, निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटल भोसरी, एडवोकेट कांता गोर्डे - शेजवळ, डॉक्टर सायली बारसे, युवा सामाजिक कार्यकर्ते बापू दिनकर कातळे, सौ. ज्योती गोफणे, सौ. ज्योती निंबाळकर, सौ. अंकिता राऊत, सौ. शैला निकम, श्रीमती शोभा उर्फ नानी जगताप, सौ ज्योती भालके, श्री. विजय जरे, श्री. प्रवीण माळी, सौ. कीर्ती जाधव, व सौ. मनीषा चंद्रकांत शिंदे यांना मेट्रोसिटी आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे सदर कार्यक्रम हा दोन जानेवारी रोजी ऑटो क्लस्टर सभागृह चिंचवड येथे दुपारी ३ वाजता संपन्न होत आहे.

तसेच या पुरस्कार सोहळ्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते राहुल कोल्हटकर , डॉक्टर शैलेश देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते संभाजी बारणे, वृत्तपत्र विक्रेते अनिल दळवी, माजी नगरसेविका अमिना पानसरे, पत्रकार बापू गोरे, एडवोकेट दीपक साबळे व सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर तसेच शिक्षक योगेश डावरे यांचा विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात येत आहे. याचबरोबर या कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरातील दहा महिला बचत गटांचा ही सन्मान करण्यात येत आहे यामध्ये प्रसन्न महिला बचत गट, निधी महिला बचत गट, मातोश्री महिला बचत गट, जिजाई महिला बचत गट, येसू महिला बचत गट,, श्री तुळजाई महिला बचत गट, श्री अंबिका महिला बचत गट, यशोधरा महिला बचत गट, जिजाऊ महिला बचत गट, क्रांती महिला बचत गट, वनमाला महिला बचत गट, सखी महिला बचत गट या महिला बचत गटांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.सदर कार्यक्रमात पिंपरी चिंचवड व पुणे शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शबनम न्यूज मीडिया ग्रुपच्या संस्थापिका शबनम सय्यद यांनी केले आहे.

**✻ पुरस्कारार्थी ✻**



# मा.पंतप्रधान तथा अर्थतज्ञ डॉ.मनमोहन सिंग अनंतात विलीन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

देशाला नव्या आर्थिक विकासाची दिशा देणारे तसेच देशाला जागतिकीकरणाच्या वाटेवर नेणारे माजी पंतप्रधान तथा अर्थतज्ञ डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी दिल्लीतील निगम बोध घाटावर शासकीय ईतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर देशभरातून अनेक मान्यवर व्यक्तींनी शोक व्यक्त केला.

तसेच संपूर्ण देशातील देशवासीय शोक सागरात बुडाले. केंद्र सरकारने देशभरात सात दिवसांचा शोक जाहीर केला आहे.



देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री दिल्लीच्या एम्स रुग्णालयात निधन झाले. एकीकडे डॉक्टर मनमोहन सिंग यांना अखेरचा निरोप देण्यासाठी दिल्लीत राजकीय नेते मंडळी प्रमाणे सामान्य नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा होत असताना दुसरीकडे त्यांचे अंत्यसंस्कार कोठे व्हावे यावरून वाद निर्माण झाला होता, एकीकडे केंद्र सरकारने स्मृती स्थळासाठी जागा देण्याचे मान्य केलं असतानाच दुसरीकडे काँग्रेसकडून मात्र स्मृतीस्थळाच्या ठिकाणीच डॉक्टर मनमोहन सिंग यांच्यावर अंत्यसंस्कार व्हावेत अशी आग्रही मागणी केली जात होती, परंतु दिल्लीच्या राजघाटावर जागेच्या अभावी अंत्यसंस्कारासाठी जागा न देता डॉक्टर मनमोहन सिंग यांचे निगमबोध घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जया किशोरी यांचे व्यक्तिमत्व व अध्यात्मिक कार्य नव्या पिढीसाठी आदर्श

## प्रा.डॉ.संजय बी.चोरडिया यांचे प्रतिपादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने प्रसिद्ध अध्यात्मिक आणि प्रेरक वक्त्या जया किशोरीजी यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात आला. अध्यात्म आणि प्रेरणादायी वक्तृत्व क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुण्यात आयोजित सोहळ्यात 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांच्या हस्ते जया किशोरी यांना सन्मानचिन्ह, सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थीनींनी बनविलेला विशेष स्कार्फ, सुवर्णपदक व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

पुरस्काराचा नम्रपणे स्वीकार करत जया किशोरी म्हणाल्या, "पंचवीस वर्षांचा प्रेरणादायी प्रवास असलेल्या 'सूर्यदत्त' संस्थेकडून मिळालेला हा पुरस्कार अभिमानास्पद आहे.

विविध ज्ञानशाखांसोबत विद्यार्थ्यांना येथे सर्वांगीण शिक्षण दिले जातेय, हे महत्वाचे आहे. आज युवकांना आध्यत्मिकतेची सर्वात जास्त गरज आहे. भौतिकवादी जगण्याला अध्यात्मिकतेची जोड दिली, तर जीवन अधिक सुसह्य होईल. शिकत राहणे हा परिवर्तनाचा नियम आहे आणि हे मूल्य सूर्यदत्त संस्थेत रुजवले जाते, याचा आनंद वाटतो."प्रा.डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "जया किशोरी या एक भारतीय आध्यात्मिक वक्त्या, गायिका, प्रेरक वक्त्या, जीवन प्रशिक्षक आणि सामाजिक सुधारणावादी नेत्या आहेत. त्यांच्या आध्यात्मिक प्रवचनांसाठी आणि भावपूर्ण भजनांसाठी लाखो भक्तगण आसुसलेले असतात. 'किशोरीजी' आणि 'आधुनिक युगातील मीरा' म्हणून त्यांना ओळखले जाते. अशा या महान व्यक्तीचा सन्मान करताना सूर्यदत्त परिवाराला आनंद होत आहे.

त्यांच्या आदर्श कार्यातून 'सूर्यदत्त'मधील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल." आपल्या उत्कृष्ट कार्यातून समाजात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. उत्कृष्टता हे 'सूर्यदत्त'चे वैशिष्ट्य असून, गेल्या अडीच दशकांच्या प्रवासात 'सूर्यदत्त'ने २००३ पासून हा पुरस्कार सुरु केला आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, औद्योगिक,



वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात परिवर्तनवादी अमूल्य योगदाना देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना आजवर सन्मानित करून विद्यार्थी, पालक आणि समाजाला प्रेरणा देण्याचा प्रयत्न यामागे आहे.

पद्मभूषण पंडित भीमसेन जोशी, पद्मविभूषण शास्त्रज्ञ डॉ. कस्तुरीरंजन, योगाचार्य पद्मभूषण डॉ. बीकेएस अय्यंगार, प्रख्यात अभिनेते पद्मभूषण अनुपम खेर, पद्मभूषण शिव नाडर, माजी पोलीस अधिकारी किरण बेदी, पद्मविभूषण मोहन धारिया, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आध्यात्मिक आणि प्रेरक वक्ते गौर गोपाल दास यांच्यासह अनेक मान्यवरांना या पुरस्काराने गौरवान्वित केले आहे, असे स्नेहल नवलखा यांनी नमूद केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 29/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# रतन टाटा यांना भारतरत्न द्यावे,टीम पिं.चिं.स्वाक्षरी मोहीम


## पिंपरी चिंचवड शहरात रतन टाटा यांचे स्मारक उभारावे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी पुणे : भारतीय उद्योग विश्वाचा पाया रचण्यात टाटा कुटुंबीयांचे अतुलनीय योगदान आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरात टाटा मोटर्स सह टाटा कंपनीच्या इतर शाखांमुळे शहराचे नाव जागतिक पातळीवर पोहोचले आहे. या शहराच्या औद्योगिक पायाभरणीमध्ये उद्योगपती स्वर्गीय रतन टाटा यांचे अमूल्य योगदान आहे.

कामाप्रति त्यांची निष्ठा आणि आपल्या कामगारांवर असणारे त्यांचे प्रेम यामुळे आज लाखो लोकांना रोजगार निर्माण झाला आहे. स्व. रतन टाटा यांचे उद्योग विश्वाविषयी असणारे कार्य घरोघरी पोहोचायला पाहिजे. यासाठी त्यांना केंद्र सरकारने मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करावे अशी मागणी पिंपरी चिंचवड शहरातून "टीम पिंपरी चिंचवड" च्या वतीने करण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत स्वर्गीय रतन टाटा यांचे तैलचित्र आणि शहरामध्ये त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारून स्मारक उभारावे या मागणीसाठी टीम पिंपरी चिंचवडचे समन्वयक जयदीप उमा गिरीश खापरे यांनी गुरुवार दि. १९ डिसेंबर पासून स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. लाखो नागरिकांचे हे स्वाक्षरीचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्यक्ष भेटून देण्यात येणार आहे.

तसेच शनिवारी (दि. २८) स्वर्गीय रतन टाटा यांच्या प्रथम जयंती निमित्त चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे सायंकाळी सहा वाजता रतन टाटा यांना आदरांजली वाहण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रतन टाटा यांचे कार्य घरोघरी पोहोचावे यासाठी टीम पिंपरी चिंचवडच्या वतीने रतन टाटा यांचे छायाचित्र असणारी फ्रेम शहरातील दहा हजार कुटुंबांना घरोघरी जाऊन भेट देण्यात येणार आहे अशी माहिती टीम पिंपरी चिंचवडचे समन्वयक जयदीप उमा गिरीश खापरे, सुशांत मोहिते, सोमनाथ काळभोर, अनिरुद्ध संकपाळ यांनी प्रसिद्धीस दिली आहे.




# विद्यार्थ्यांना कौशल्य विकास आधारित शिक्षण द्यावे

## सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : कौशल्याधारित काम करणाऱ्या मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असल्याने बार्टीने विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास आधारित शिक्षण द्यावे त्यासाठी कौशल्याधारित अभ्यासक्रमाचे आयोजन करावे अशी सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) येथे आयोजित समाज कल्याण विभागाच्या बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक इंदिरा अस्वार, विभाग प्रमुख स्नेहल भोसले, उमेश सोनवणे, रवींद्र कदम, शुभांगी पाटील आणि समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी बार्टीच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या संस्था राबवित असलेले अभ्यासक्रम व प्रशिक्षण, समाज कल्याण विभागातील रिक्त पदे यांचा आढावा घेतला.

समाज कल्याण विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती या वेळेतच विद्यार्थ्यांना मिळाव्यात, शिष्यवृत्ती पासून कोणी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, मागासवर्गीय समाजाला हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी रमाई योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना विना विलंब मिळावे यासाठी सुलभ कार्यपद्धती राबवावी आणि जात पडताळणी प्रमाणपत्र लवकर मिळेल याची दक्षता घ्यावी अशी सूचनाही श्रीमती मिसाळ यांनी केली.



बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी बार्टीच्या कामकाजाची तसेच राबविण्यात येणाऱ्या योजना आणि उपक्रम याची माहिती दिली. बैठकीला बार्टी तसेच समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 29/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आमदार अमित गोरखे यांचा तृतीयपंथी समुदायातर्फे सत्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशनात आमदार अमित गोरखे यांनी राज्यातील तृतीयपंथीयांचे कल्याण व त्यांच्या संरक्षण करण्याकरिता तृतीयपंथीयांचे कल्याण मंडळ यासाठी रूपये १० कोटी इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आपल्याबद्दल सरकारचे अभिनंदन केले सोबतच तृतीयपंथी- सामाजिक दृष्ट्या मागासलेला घटक वंचितांच्या, शोषितांच्या व कामगारांच्या प्रश्नांवर आवाज उठविणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच समाजातील आणखीन एका घटकासाठी माणूस म्हणून उभे राहणे तो घटक म्हणजे तृतीयपंथी म्हणूनच नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये पिंपरी चिंचवड मनपाच्या धर्तीवर तृतीयपंथींना सुद्धा राज्यभरात राज्य शासनासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नोकरीची संधी दिली पाहिजे, अशी ठाम मागणी केली असून या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील तृतीयपंथींनी भेट देऊन आमदार अमित गोरखे यांचा सन्मान केला. समाजातील तृतीयपंथींचे जीवनमान चांगले व्हावे व एका साधारण नागरिकाप्रमाणे त्यांना ते जगता यावे, यासाठी अधिवेशनामध्ये मी घेतलेली भूमिका एक छोटासा प्रयत्न होता. पण



सर्वार्थाने समाजातील तृतीयपंथींचा संघर्ष संपावा व शिक्षण तसेच नोकरी क्षेत्रात त्यांचा वावर सहज व्हावा यासाठी इथून पुढे ही मी प्रयत्नशील राहील असे यावेळी आ.अमित गोगोरखे म्हणाले.

# भक्ती - शक्ती उड्डाणपुलावर वाळू ने भरलेला डंपर पलटी

पिंपरी चिंचवड : शनिवारी सकाळी भक्ती शक्ती उड्डाणपूल यावर अपघात झाला तळेगाव कडून पुण्याकडे येणाऱ्या रस्त्यावर ,भक्ती शक्ती उड्डाणपुलावर भरधाव वेगाने वाळू ची वाहतूक करणारा डंपर पलटी झाला. चालकाला गाडी चा वेग व तोल सुटल्याने सदर अपघात घडला या अपघातामध्ये ड्रायव्हर व किन्नर यांना खूप मोठ्या प्रमाणात दुखापत झाली सुदैवाने या अपघातामध्ये कोणती हि जीवित हानी झाली नाही अपघात ठिकाणी पोलीस यंत्रणा , अग्निशामक दल, आरोग्य विभागाचे कर्मचारी, ट्राफिक पोलीस , व क्रेन सर्विस करणाऱ्या आकाश क्रेन सर्विस चे सर्व जण तात्काळ घटनास्थळी पोहोचले , या भागातील मनसे चे शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या सह त्यांचे सर्व सहकारी, कार्यकर्ते मदतीला सरावले , डम्पर उचलण्यात आला, व रस्त्यावर पडलेली वाळू उचलून रस्ता साफ करण्यात आला या वेळी काही वेळ वाहतूक बंद करण्यात आली वाहतूक सुरु करण्या साठी किमान तीन ते चार तास लागले, यावेळी गाडी चालक यांच्यावर निगडी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल दाखल करण्यात आलाय




# उत्पादन शुल्क भरारी पथक कारवाईत 31 लाखाचा मुद्देमाल जप्त

पुणे, : पुणे विभागाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथकाच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत अहमदनगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील अरणगाव तसेच धाराशिव जिल्ह्यात परांडा तालुक्यातील लोणारवाडी येथे ३१ लाख २३ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांनी दिली आहे.

विभागीय भरारी पथकाच्यावतीने अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यामधील अरणगाव गावाच्या हद्दीत श्रीगोंदा जामखेड मार्गावरील एच. पी. पेट्रोल पंपाजवळ महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ चारचाकी वाहनामधील गोवा बनावटीचे मद्य मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर वाहनामध्ये भरत असताना छापा मारुन गोवा बनावटीच्या ॲडीरियल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या एकूण ३२४ सिलबंद बाटल्यांचे २७ बॉक्स, दोन वाहनासह अंदाजे रक्कम १६ लाख ७२ हजार ७२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.




या गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील तपासामध्ये धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात लोणारवाडी परिसरात भैरवनाथ मंदिराजवळ अशोक लेलॅण्ड कंपनीचा दोस्त चारचाकी वाहन व मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर या वाहनासह ॲडरीयल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या २१६ सिलबंद बाटल्यांचे १८ बॉक्स असा अंदाजे रक्कम १४ लाख ५० हजार ४८० रुपये किंमतीचा मुद्देमाल रिकव्हरी पंचनाम्याखाली जप्त करुन दोन व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968